www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**D**

# Paper-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ......................................

(Name) ..............................................

2. (Signature) ......................................

(Name) ..............................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## JUN - 01220

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **20** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   - (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



# Marathi
# Paper II
# मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. दलित समाजाची अवहेलना करणाऱ्या उच्चभ्रू वर्गाची मानसिकता चित्रित करणारी 'जागर' ही कादंबरी कोणी लिहिली आहे ?
   (A) केशव मेश्राम
   (B) सुधाकर गायकवाड
   (C) मुरलीधर जाधव
   (D) प्रेमानंद गज्वी

2. तिसरे आदिवासी साहित्य संमेलन कुठे पार पडले ?
   (A) अमरावती
   (B) नासिक
   (C) किनवट
   (D) नंदुरबार

3. "शेतकऱ्यांच्या हक्कासाठी संघर्षरत असणारी 'शेतकरी संघटना' ही चळवळ लढाऊ होती परंतु ग्रामीण साहित्याचे हित ध्यानात आल्यामुळे या संघटनेने सौम्य रूप धारण केले."
   (A) संपूर्ण विधान बरोबर
   (B) संपूर्ण विधान चूक
   (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

4. अनन्वित छळामुळे हिंदू धर्माचा त्याग करून इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्या दलितांच्या धर्मांतराचे सत्य घटनेवर आधारित चित्रण पुढीलपैकी कोणत्या नाटकात आढळते ?
   (A) बामणवाडा
   (B) साक्षीपूरम
   (C) आधारस्तंभ
   (D) वांझ माती

5. वाङ्मयीन नियतकालिके पुढीलपैकी कोणत्या कारणामुळे बंद पडतात ?
   (A) पुरेसे कसदार साहित्य उपलब्ध होत नसल्यामुळे
   (B) सर्व मराठी साहित्यविश्वाचे पुरेसे प्रतिनिधित्व होत नसल्यामुळे
   (C) प्रस्तुतता आणि प्रयोजन संपल्यामुळे
   (D) संपादकाचा उत्साह मावळल्यामुळे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



6. नवसाहित्याचा व प्रयोगशीलतेचा पुरस्कार करून वाङ्‌मयीन नियतकालिकाची संकल्पना अधिक विकसित करणारे नियतकालिक कोणते ?

(A) पारिजात

(B) अभिरुची

(C) रत्नाकर

(D) यशवंत

7. 'ती जनता अमर आहे' ही विंदा करंदीकरांची कविता कोणत्या नियतकालिकात प्रसिद्ध झाली होती ?

(A) अभिरुची

(B) सत्यकथा

(C) मौज

(D) पंचधारा

8. दुष्काळी कामावर राबणाऱ्या स्त्रियांचे मुकादमा-कडून होणाऱ्या लैंगिक शोषणाचे चित्रण भास्कर चंदनशिव यांनी कोणत्या कथेत केले आहे ?

(A) अंगारमाती

(B) वाळवी

(C) माती

(D) पोळ

9. 'अचाट गावची अफाट मावशी' हे बालनाट्य कोणत्या संस्थेने सादर केले ?

(A) चिल्ड्रन्स थिअटर

(B) लिटल थिअटर

(C) बालनाट्य

(D) चंद्रशाळा

10. 22 मार्च 1970 रोजी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना कोणी केली ?

(A) हुसेन जमादार

(B) हमीद दलवाई

(C) हुसेन दलवाई

(D) फकरूद्दिन बेन्नूर

11. कादंबरीतून साहित्य संमेलनाच्या बऱ्या-वाईट गोष्टींचे चित्रण कोणत्या लेखकाने केले आहे ?

(A) द. ता. भोसले

(B) वासुदेव मुलाटे

(C) रंगनाथ पठारे

(D) नागनाथ कोत्तापल्ले



Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



12. 'कारखान्यातील कामगार आणि शेतकरी यांनी एकत्र येऊन 'भाडवल सुरा' विरोधात उभे राहिले पाहिजे.' हा विचार कोणी मांडला ?

(A) छ. शाहू महाराज

(B) महर्षी वि. रा. शिंदे

(C) कृष्णराव भालेकर

(D) भाई माधवराव बागल

13. भा. वि. वरेरकर यांची मार्क्सवादी विचार मांडणारी कादंबरी कोणती ?

(A) धावता धोटा

(B) विधवाकुमारी

(C) अश्रू

(D) भंगलेले देऊळ

14. मम्मटाच्या काव्यलक्षणातील प्रत्येक शब्दावर घणाघाती टीका करून ते काव्यलक्षण निरर्थक कोणी ठरवले ?

(A) जगन्नाथ

(B) विश्वनाथ

(C) अप्पय्यदीक्षित

(D) अभिनवगुप्त

15. प्रतिभाशक्तीची व्याख्या करतांना 'प्रज्ञा' ही संज्ञा कोणत्या समीक्षकांनी वापरली आहे ?

(A) दण्डी, मम्मट व वाग्भट

(B) वाग्भट, हेमचंद्र व अभिनवगुप्त

(C) जगन्नाथ, अभिनवगुप्त व रुद्रट

(D) दण्डी, हेमचंद्र व अभिनवगुप्त

16. काव्यानंद मीमांसेत 'चमत्कृति' या संज्ञेचा आग्रह कोणी धरला ?

(A) क्षेमेंद्र

(B) जगन्नाथ

(C) मम्मट

(D) कुन्तक

17. भरत, दण्डी आणि वामन यांनी गुणांची संख्या किती मानली आहे ?

(A) तीन

(B) दहा

(C) चोवीस

(D) दोन

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



18. 'काकू' म्हणजे काय ?
    (A) बोलताना विशिष्ट सुरात बोलण्यामुळे होणारी अर्थनिश्चिता
    (B) नातेवाईक स्त्री
    (C) संस्कृतप्रचुरता
    (D) देशी शब्दांचा भरणा

19. पुढीलपैकी कशाचा समावेश रसविघ्नांमध्ये करता येईल ?
    (A) निजसुखादिविवशीभाव
    (B) दुर्बोधता
    (C) चित्त एकाग्र न होणे
    (D) भाषाविषयक अज्ञान

20. 'लीलाविश्वंभर' हा प्रभुलिंगलीले या कन्नड ग्रंथाचा अनुवाद असून यात बसवेश्वरांचे चरित्र वर्णिले आहे.
    (A) संपूर्ण विधान बरोबर
    (B) संपूर्ण विधान चूक
    (C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
    (D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

21. 'रुक्मिणीहरण' ही रचना कोणी केली आहे ?
    (A) मोरोपंत
    (B) गुणकिर्ती
    (C) मुकुंदराज
    (D) दामोदर पंडित

22. 'कुशलवोपाख्यान' या काव्याचा कर्ता मोरोपंत हे असून, त्यांनी ते द्वारकाविजय कथेच्या आधारे लिहिले आहे.
    (A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
    (B) संपूर्ण विधान बरोबर
    (C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक
    (D) संपूर्ण विधान चूक

23. 'भावार्थ रामायण' या ग्रंथाचा कर्ता कोण ?
    (A) कवी नरेंद्र
    (B) संत एकनाथ
    (C) रमावल्लभदास
    (D) मुक्तेश्वर

24. विशिष्ट साहित्यकृतीचे सूक्ष्म व काळजीपूर्वक वाचन कोणत्या प्रकारच्या समीक्षेत अभिप्रेत असते ?
    (A) शुद्ध समीक्षा
    (B) ऐतिहासिक समीक्षा
    (C) सैद्धान्तिक समीक्षा
    (D) उपयोजित समीक्षा

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



25. 'आस्वादक समीक्षे'चे प्रमुख वैशिष्ट्य कोणते आहे ?
(A) उत्कट आत्मप्रत्यय
(B) विशिष्ट विचारव्यूह
(C) तार्किकता
(D) चिकित्सकता

26. 'सरासरी वाचक' आणि 'विविध शैलीगत क्लृप्त्यांचा मिलाफ' या दोन संकल्पना कोणी मांडल्या आहेत ?
(A) जे. पी. थोर्न
(B) सॅम्युएल. आर. लेविन
(C) मायकेल रिफाटेरे
(D) जे. सिंक्लेअर

27. 'उच्च मध्यमवर्गीय स्त्रियांच्या भावविश्वाचे चित्रण असल्यामुळे गौरी देशपांडे यांच्या साहित्यातून कृतक-दु:खाची अभिव्यक्ती होते' हे विधान कोणत्या समीक्षा पद्धतीचे निदर्शक आहे ?
(A) मानसशास्त्रीय
(B) ऐतिहासिक
(C) समाजशास्त्रीय
(D) रूपवादी

28. 'कादंबरी'च्या साहित्यशास्त्राचा ऊहापोह करताना 'कथनाचे करार' ही संकल्पना कोणी मांडली आहे ?
(A) जोनाथन कलर
(B) मॉड बॉडकिन
(C) ॲरिस्टॉटल
(D) आय. ए. रिचर्ड्स

29. 'चार ऋतुंशी निगडित असलेल्या आदिम मिथ्यकथांमधून वाङ्मयप्रकारांचा उद्‌भव झाला' असे मत कोणी मांडले आहे ?
(A) रोलां बार्थस
(B) रेने नेलेक
(C) नॉर्थ्रॉप फ्राय
(D) टी. एस. इलियट

30. 'आजकालच्या गोष्टी' कोणी लिहिल्या आहेत ?
(A) ह. ना. आपटे
(B) वि. सी. गुर्जर
(C) नाथमाधव
(D) गो. ना . दातार

Prepp
Your Personal Exams Guide



31. मुद्राक्षरकलेतील आकार व सौंदर्य तत्त्व केन्द्रस्थानी ठेवून 'कविते'चे दृश्यरूप कोणी अधोरेखित केले आहे ?

(A) कमल शेडगे

(B) जयंत जोशी

(C) र. कृ. जोशी

(D) बाळ ठाकूर

32. 'ललित गद्या'चे प्रधान लक्षण कोणते आहे ?

(A) रमणीय अर्थ प्रतिपादकता

(B) वैचारिक स्पष्टता

(C) काव्यात्मकता

(D) 'मी' त्याच्या व्यक्तित्वविशेषांचा आविष्कार

33. तर्कसंगत युक्तिवाद व खंडनमंडन ही कोणत्या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये आहेत ?

(A) वैचारिक निबंध

(B) लघुनिबंध

(C) चरित्र

(D) रसग्रहण

34. पुढीलपैकी कोणत्या विचारवन्ताची रोजनिशी प्रकाशित झाली आहे ?

(A) महात्मा जोतीबा फुले

(B) विठ्ठल रामजी शिंदे

(C) कृष्णराव भालेकर

(D) विष्णुबुवा ब्रह्मचारी

35. भारतातील 'पथनाट्या'चे प्रेरणास्थान कोणास मानले जाते ?

(A) गिरीश कार्नाड

(B) बादल सरकार

(C) मोहन राकेश

(D) बी. व्ही. कारंथ

36. योग्य जोड्या लावा :

| ग्रंथ | | ग्रंथकार | |
|---|---|---|---|
| (*a*) | नरेंद्र | (*i*) | ज्ञानप्रबोध |
| (*b*) | नारायणबास बहाळिये | (*ii*) | रुक्मिणी स्वयंवर |
| (*c*) | भास्कर | (*iii*) | वच्छाहरण |
| (*d*) | दामोदर | (*iv*) | ऋद्धीपुरवर्णन |
| (*e*) | विश्वनाथ बाळापूरकर | (*v*) | सह्याद्री वर्णन |
| | | (*vi*) | उद्धव गीता |

(A) *a*–(*i*) *b*–(*vi*) *c*–(*iv*) *d*–(*ii*) *e*–(*v*)

(B) *a*–(*i*) *b*–(*ii*) *c*–(*iii*) *d*–(*iv*) *e*–(*v*)

(C) *a*–(*ii*) *b*–(*iv*) *c*–(*vi*) *d*–(*iii*) *e*–(*i*)

(D) *a*–(*vi*) *b*–(*ii*) *c*–(*iii*) *d*–(*i*) *e*–(*iv*)

37. ''शिशुपाळ वरू ऐंसे आइकिलें बाळा :
भुपातली निऱ्हां जाली व्याकुळ:''
या पंक्ती कोणत्या ग्रंथातील आहेत ?

(A) रुक्मिणी स्वयंवर

(B) महदंबेचे धवळे

(C) शिशुपालवध

(D) श्री दत्तात्रेय बाळक्रीडा

38. पुढीलपैकी कोणता प्रसंग म. फुलेकृत शिवाजी महाराजांचा पवाडा या काव्यग्रंथात आला **नाही** ?

(A) रायरेश्वराची शपथ

(B) काशीकर गंगाभटाचा खेळ

(C) आग्ऱ्याहून सुटका

(D) शाहिस्तेखानाची स्वारी

39. पुढीलपैकी कोणती कविता स्त्री मनातील दु:खाचा ठाव घेते ?

(A) पायी चालणार

(B) जनरल वार्ड

(C) त्रिमेरी

(D) खळीळ पाण्यात

40. लग्नविधीतील 'झालू' गीताचा उल्लेख पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीमध्ये आला आहे ?

(A) जिणं आमुचं

(B) स्मृतिचित्रे

(C) मराठी गौळणी

(D) आयदान

41. साहित्याच्या भाषेमध्ये व्यवहारभाषेपेक्षा मुख्यत्वे कोणते वेगळेपण असते ?

(A) शब्दसंग्रहाचा वापर

(B) व्याकरणिक रचना

(C) ध्वनींची योजना

(D) अर्थांची प्रसरणशीलता

42. भाषेच्या लिखित रूपापेक्षा मौखिक भाषा चल, परिवर्तनशील असतात; त्यामुळे मौखिक रूपात दर्जेदार साहित्य निर्माण होऊ शकत **नाही**.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

Prepp
Your Personal Exams Guide



43. संधी विचारात समासविचारापेक्षा कोणता निराळा घटक प्रस्तुत असतो ?

(A) अर्थान्वय

(B) शब्दान्वय

(C) ध्वनिप्रक्रिया

(D) प्रत्ययलोप

44. 'नगरातल्या उद्यानातील आम्रवृक्ष फळांनी लगडले होते.' — या वाक्यातील कर्ता पुढीलपैकी कोणता ?

(A) नगर

(B) उद्यान

(C) आम्रवृक्ष

(D) फळे

45. विशेष्याच्या नंतर येणाऱ्या विशेषणास काय म्हणतात ?

(A) गुणविशेषण

(B) सिद्धविशेषण

(C) अधिविशेषण

(D) विधिविशेषण

46. 'सदा सर्वदा योग तूझा घडावा' ही रचना पुढीलपैकी कोणत्या वृत्तात आहे ?

(A) शार्दूलविक्रीडित

(B) भुजंगप्रयात

(C) आर्या

(D) अनुष्टुभ

47. एका भाषाकुलामधील भाषांमध्ये कोणत्या प्रकारचे साम्य असते ?

(*i*) मूलभूत शब्दसंग्रह व रूपव्यवस्था यातील साम्य

(*ii*) देवाणघेवाणीने न आलेले व यादृच्छिक नसलेले साम्य

(A) (*i*) व (*ii*)

(B) (*i*) फक्त

(C) (*ii*) फक्त

(D) (*i*) व (*ii*) दोन्हीही नाही

48. पुढीलपैकी कोणता गट आशयबोधक पदिमांचा आहे ?

(A) नदी, देवालय, राजवाडा

(B) टेबल, झाड, माणूस

(C) अनु, प्रति, बे

(D) ने, ला, चा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



49. पुढीलपैकी कोणता अभ्यासक वर्णनात्मक भाषाभ्यासाशी संबंधित **नाही** ?

(A) लबव

(B) ब्लूमफील्ड

(C) सोस्यूर

(D) चॉम्स्की

50. विविध भाषिक पर्यायांचा सामाजिक संदर्भानुसार योग्य वापर करण्याच्या क्षमतेला काय म्हटले जाते ?

(A) भाषिक क्षमता

(B) व्याकरणिक क्षमता

(C) संज्ञापन क्षमता

(D) वक्तृत्व क्षमता

51. एखादी बोली प्रमाणभाषा म्हणून मान्यता पावण्यास ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थिती कारणीभूत असते; एरवी भाषावैज्ञानिकदृष्ट्या अन्य बोलींपेक्षा ती वेगळी नसते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

52. पुढीलपैकी कोणते आविष्कार माध्यम वाचकालाही तात्काळ प्रतिसादाची संधी देणारे आहे ?

(A) मुद्रित ग्रंथ

(B) नियतकालिक

(C) ब्लॉग

(D) ई-बुक

53. पुणे येथे संपन्न झालेल्या पहिल्या ग्रामीण साहित्य मेळाव्याचे अध्यक्ष कोण होते ?

(A) मधु मंगेश कर्णिक

(B) आनंद यादव

(C) ग. ल. ठोकळ

(D) प्राचार्य देवदत्त दाभोळकर

54. वाङ्मय प्रसाराच्या कार्यात सर्वाधिक वाटा पुढीलपैकी कोणत्या घटकाचा असतो ?

(A) संपादक

(B) लेखक

(C) प्रकाशक

(D) वितरक

55. जगातल्या महत्त्वाच्या ग्रंथालयांपैकी एक असणारे आणि मराठी भाषेतील विपुल ग्रंथांनी सजलेले 'सरस्वती महाल' ह्या नावाचे ग्रंथालय कोठे आहे ?

(A) कलकत्ता

(B) मुंबई

(C) तंजावर

(D) नवी दिल्ली

56. गो. ब. देवल यांच्या 'शारदा' नाटकाच्या शेवटी शंकराचार्यांच्या आगमनाचा आणि निवाडा करण्याचा प्रसंग घालण्यातून लेखकाचा कोणता हेतू दिसतो ?

(A) ती नाटकाची गरज होती

(B) नाट्यसंकेताचा अनुसरणाचा हेतू

(C) प्रेक्षकानुन याचा हेतू

(D) तत्कालीन सांस्कृतिक दडपणाचा परिणाम

57. "एका काट्याच्या अणीवर बसली तीन गावं
दोन ओसाड वा एक वसेचि ना
वसेचिना वसेचिना, तेथे आले तीन कुंभार
दोन आंधळे एक दिसेचिना."
हे भारूड कोणी रचले आहे ?

(A) दासोपंत

(B) एकनाथ

(C) नामदेव

(D) ज्ञानदेव

58. "रे. बाबा पदमनजी म्हणजे मराठी ख्रिस्ती सारस्वताचे जनक होत. त्यांच्या हातून बनलेली मराठी पुस्तके वजा केली तर आज मराठी ख्रिस्ती वाङ्मय असून नसल्यासारखेच होईल" हे उद्गार कोणाचे आहेत ?

(A) भास्कर दामोदर पाळंदे

(B) ना. वा. टिळक

(C) फादर फ्रान्सिस दीब्रोटो

(D) विश्वनाथ नारायण मंडलिक

59. 'संयुक्त महाराष्ट्राचा गोंधळ' कोणी लिहिला आहे ?

(A) शाहीर आत्माराम पाटील

(B) शाहीर गोपाळराव सुर्वे

(C) शाहीर भिका पाटील

(D) शाहीर करीम शेख

60. "सत्यशोधकी जलशांचीच एक विकसित अवस्था आंबेडकरी जलशांच्या रूपाने कार्यान्वित झाली आणि त्यामुळे नवे तरुण आंबेडकरी चळवळीकडे आकर्षित झाले."

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

61. पुणे येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कोण अध्यक्ष असताना, ते उधळले गेले होते ?
(A) गंगाधर गाडगीळ
(B) प्रभाकर पाध्ये
(C) पु. भा. भावे
(D) व्यंकटेश माडगूळकर

62. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्षाविना कुठे पार पडले ?
(A) वर्धा
(B) प्रवरानगर
(C) वाई
(D) महाबळेश्वर

63. 'मॅकबेथ' या शेक्सपिअरच्या नाटकांचा मराठीत अनुवाद कोणी केला ?
(A) राम गणेश गडकरी
(B) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
(C) गोविंद बल्लाळ देवल
(D) वि. वा. शिरवाडकर

64. "अनुकरण हे वरवरचे असते. ते बाह्य वाङ्मय-घटकांपुरतेच सीमित असते."
(A) वरील विधान संपूर्णत: सत्य आहे
(B) वरील विधानातील पूर्वार्ध सत्य असला तरी उत्तरार्ध सत्य नाही
(C) वरील विधानाचा पूर्वार्ध सत्य नाही, परंतु उत्तरार्ध मात्र सत्य नाही
(D) वरील विधान पूर्णत: असत्य आहे

65. 'शेक्सपीरिअन सॉनेट' मधील काव्यगत आशयाची विभागणी ओळींच्या संदर्भात कशी असते ?
(A) नऊ आणि पाच
(B) दहा आणि चार
(C) बारा आणि दोन
(D) आठ आणि सहा

66. संपूर्ण भारतीय साहित्याच्या इतिहासात प्रथमपुरुषी निवेदनपद्धती पहिल्यांदा मोरोपंतांनी तीन रामायणां-मध्ये समर्पक रीतीने वापरली, ती तीन रामायणे कोणती ?
(A) 'सीता रामायण', 'हनुमंत रामायण' आणि 'सद्‌गुरु रामायण'
(B) 'सीता रामायण', 'हनुमंत रामायण' आणि 'मंत्र रामायण'
(C) 'दाम रामायण', 'हनुमंत रामायण' आणि 'सद्‌गुरु रामायण'
(D) 'सीता रामायण', 'निरोष्ठ रामायण' आणि 'सद्‌गुरु रामायण'

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



67. 'तौलनिक समीक्षेचा जनक' असे कोणास म्हटले जाते ?

(A) जॉन ड्रायडन

(B) मॅथ्यू आर्नोल्ड

(C) बंकिमचंद्र चट्टोपाध्याय

(D) हरी नारायण आपटे

68. महात्मा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पुढीलपैकी कोणत्या साहित्यकृतीवर दिसून येतो ?

(A) मर्ढेकरांची कविता

(B) वि. वा. शिरवाडकर यांची कादंबरी 'वैष्णव'

(C) पु. शि. रेगे यांची कविता

(D) बाबूराव बागुल यांची लघुकादंबरी 'सूड'

69. नॅशनल बुक ट्रस्टने भारतीय भाषांमधील साहित्य-कृतींची भाषांतरे प्रकाशित करण्याच्या उपक्रमास काय नाव दिले आहे ?

(A) भाषांतरमाला

(B) आदानप्रदान

(C) रूपांतरमाला

(D) आंतरभारती

70. तौलनिक साहित्य या विषयावरील मराठीतील पहिले पुस्तक कोणते ?

(A) वसंत बापट : 'तौलनिक साहित्याभ्यास'

(B) चंद्रशेखर जहागीरदार : 'तौलनिक साहित्याभ्यास तत्त्वे आणि दिशा'

(C) आनंद पाटील : 'मराठी नाटकावरील इंग्रजी प्रभाव'

(D) आनंद पाटील : 'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन'

71. मराठी वाङ्मयीन संस्कृतीत कोणत्या दोन प्रक्रियांची सरमिसळ होत गेली ?

(A) भाषांतर आणि टीका

(B) टीका आणि भाष्य

(C) पाश्चात्यीकरण आणि संस्कृतीकरण

(D) प्रभाव आणि प्रभव

72. 'यमुना पर्यटन' या कादंबरीचा अपवाद वगळता प्रारंभीच्या काळातील मराठी कादंबऱ्या कोणत्या प्रकारच्या होत्या ?

(A) आत्मनिवेदनात्मक

(B) संवादप्रचुरता

(C) सामाजिक विश्लेषण

(D) रंजनवादी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



73. लोकसाहित्यविषयक अभ्यासातील 'भारतमूलक' सिद्धांत कोणी मांडला ?

(A) जेम्स फॅरेर

(B) ज्युलियस क्रोन

(C) ए. बी. टायलर

(D) थिओडोर बेनफे

74. लोकसाहित्याभ्यासात वर्णनात्मक अभ्यास-पद्धतीचा वापर करून कोडी, उखाणे यांचा अभ्यास कोणी केला ?

(A) कार्ल अब्राहिम

(B) ज्युलियस क्रोन

(C) रॉल्फ कॉक्स

(D) आर्चर टायलर

75. लोक सांस्कृतिक दृष्टिकोणातून दैवतकथांचा अभ्यास करणारा मराठीतील अभ्यासक कोण ?

(A) ग. ह. खरे

(B) रा. चिं. ढेरे

(C) द. वा. पोतदार

(D) वि. का. राजवाडे

76. भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाला केव्हा गती मिळाली ?

(A) शिवाजी महाराजांच्या काळात

(B) इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यानंतर

(C) संत साहित्य प्रसृत झाल्यानंतर

(D) भाषाविचारांची प्रतिष्ठापना झाल्यानंतर

77. जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (1) वैजनाथ कळसे | (5) दगडफोड्या |
| (2) वसंत मून | (6) ढोर |
| (3) गौतम कावळे | (7) वस्ती |
| (4) भगवान इंगळे | (8) बावळट |
| | (9) आयरनीच्या घना |

(A) 1-8, 2-5, 3-7, 4-6

(B) 1-9, 2-7, 3-5, 4-6

(C) 1-9, 2-5, 3-8, 4-7

(D) 1-9, 2-7, 3-8, 4-6

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



78. पुढीलपैकी कोणाचे लेखन सर्वप्रथम 'अस्मिता' मधून प्रकाशित झाले ?
(A) गंगाधर पानतावणे
(B) बाबुराव बागूल
(C) प्र. ई. सोनकांबळे
(D) लक्ष्मण गायकवाड

79. 'अंत:स्थ' हा कवितासंग्रह कोणाचा आहे ?
(A) उषा अंभोरे
(B) हिरा बनसोड
(C) प्रज्ञा लोखंडे
(D) ज्योती लांजेवार

80. 'उद्धव शेळके कथेतून व्यक्तिचित्रे रेखाटताना त्यांच्या बाह्यांगावर भर देण्यापेक्षा अंतर्मनाचे दर्शन घडवतात तथापि त्यांचे हे वैशिष्ट्य कथेला वाङ्मयीनदृष्ट्या कमकुवत करते.''
(A) पूर्ण विधान बरोबर आहे
(B) पूर्ण विधान चूक आहे
(C) विधानाचा फक्त पूर्वार्ध बरोबर
(D) विधानाचा फक्त उत्तरार्ध बरोबर

81. 'घुंगरू' या कादंबरीचे लेखक कोण आहेत ?
(A) शंकर खंडू पाटील
(B) उद्धव शेळके
(C) ग. ल. ठोकळ
(D) द. मा. मिरासदार

82. 'कडुनिंबाची सावली' हा कथासंग्रह कोणाचा आहे ?
(A) शंकर पाटील
(B) उद्धव शेळके
(C) रा. रं. बोराडे
(D) प्रतिमा इंगोले

83. मध्ययुगीन वाङ्मयेतिहासाच्या व्यवस्थापनासाठी आधार म्हणून पुढीलपैकी कोणत्या घटकाचा विचार करता येत **नाही** ?
(A) लोकसंस्कृतीचे घटक
(B) सांप्रदायिक प्रेरणा
(C) राज्यव्यवहाराशी संबंधित लेखन
(D) आत्मानुभूती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



84. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे व्यवस्थापन करताना निराळा व्यूह स्वीकारणे आवश्यक ठरते; कारण तत्कालीन संदर्भात 'वाङ्मय' या संज्ञेची कल्पना आणि व्याप्ती आधुनिक काळापेक्षा वेगळी असणार.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) संपूर्ण विधान चुकीचे

85. घटना आणि घटनाशोधाची सामग्री म्हणजे इतिहास नव्हे, ही जाणीव कोणी करून दिली ?

(A) इ. एच. कार

(B) तेन

(C) विष्णुशास्त्री चिपळूणकर

(D) वि. का. राजवाडे

86. अंशलक्ष्यी (ॲटमिस्ट हिस्टरी) व समग्रलक्ष्यी (ऑर्गॅनिक हिस्टरी) या लेखनप्रणालींच्या विशेषांचे अचूक वर्णन कोणी केले आहे ?

(A) ऑस्टिन वॉरेन

(B) आर. एस. क्रेन

(C) सर ल्युइस नेमिअर

(D) एल. सी. नाइट्स

87. नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागे। सवें पांडुरंगें येवोनिया।

सांगितलें काम करावें कवित्व। वाउगें निमित्य बोलों नको॥

हे उद्गार कोणाचे आहेत ?

(A) रामदास

(B) परिसा भागवत

(C) तुकाराम

(D) कान्होपात्रा

88. 'जरा कर्णमूळी सांगो आली गोष्टी। मृत्यूचिये भेटी जवळी आली' या तुकोबांच्या अभंगावरून त्यांचे आयुर्मान 80-81 वर्षांचे असावे, असे वि. का. राजवाडे मानतात.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(C) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

(D) संपूर्ण विधान चूक

89. अल्ला निरंजन दोऊ नाही रे। समज्यत समज्यन हारो।

भाई काहे कू लडते। लडते सो पडते भाई॥

असा उपदेश कोणी केला ?

(A) रामदास

(B) एकनाथ

(C) निळोबा

(D) कल्याणस्वामी

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



90. ते दिवशी पृथ्वीकंप जाहला. गगनी धूमकेतू उदेला. उत्कापात आकाशाहून झाला. श्रीशंभुमहादेवीं तळ्याचे उदक रक्तांबर झाले. असे शिवाजी महाराजांच्या मृत्युप्रसंगीचे वर्णन कोठे आले आहे ?

(A) सभासदाच्या बखरीत

(B) एक्याण्णव कलमी बखरीत

(C) सप्तप्रकरणात्मक चरित्रात

(D) भोसले वंश चरित्रात

91. आधुनिक भारत हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) शंकर दत्तात्रय जावडेकर

(B) सखाराम जगन्नाथ भागवत

(C) श्रीनिवास नारायण बनहट्टी

(D) धनंजय रामचंद्र गाडगीळ

92. पुढीलपैकी माणिक वर्मा यांचे आत्मकथन कोणते ?

(A) स्वरवंदना

(B) स्वरमयी

(C) किती रंगला खेळ

(D) माझ्या संगीत जीवनाची वाटचाल

93. संगीतातील घराणी या ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) गोपालकृष्ण भोबे

(B) बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी

(C) नी. म. केळकर

(D) ना. र. मारुलकर

94. लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान, भारतीय लोकसत्ता, इहवादी शासन, महाराष्ट्र संस्कृती या ग्रंथांचे लेखक कोण ?

(A) गं. बा. सरदार

(B) लक्ष्मणशास्त्री जोशी

(C) चिं. वि. वैद्य

(D) पु. ग. सहस्रबुद्धे

95. मराठी स्त्री-लेखिकांची सूची (1873-1920) कोणी सिद्ध केली ?

(A) पुष्पा भावे

(B) सरोजिनी वैद्य

(C) ग. र. दंडवते

(D) दु. का. संत

96. पुढील कथासंग्रह प्रकाशनकालानुसार लिहा :

अज्ञात झऱ्यावर, पश्चिमकडा, विदेही, जमुनाके तीर

(A) पश्चिमकडा, जमुनाके तीर, विदेही, अज्ञात झऱ्यावर

(B) जमुनाके तीर, विदेही, पश्चिमकडा, अज्ञात झऱ्यावर

(C) अज्ञात झऱ्यावर, विदेही, जमुनाके तीर, पश्चिमकडा

(D) विदेही, अज्ञात झऱ्यावर, पश्चिमकडा, जमुनाके तीर

97. पुढीलपैकी कोणती नाटके अजित दळवी यांनी लिहिली आहेत ?

(A) प्रतिबिंब, वासांसि जीर्णानि, क्षितिजापर्यंत समुद्र, आत्मकथा

(B) मामका : पांडवाश्चैव, अंधारयात्रा, विष्णुगुप्त चाणक्य, रस्ते

(C) पाहुणा, ज्याचा त्याचा प्रश्न, देहभान, स्थळ : स्नेहमंदिर

(D) मुक्तिधाम, शतखंड, संघर्ष, देहधून

98. 'तंबी दुराई' या टोपणनावाने लेखन करणारे कोण आहेत ?

(A) जयवंत दळवी

(B) श्रीकांत बोजेवार

(C) विजय नेने

(D) के. ज. पुरोहित

99. 'सानिया' यांचे खरे नाव कोणते आहे ?

(A) सुनंदा कुलकर्णी

(B) आशालता कुलकर्णी

(C) पूजा कुलकर्णी

(D) स्नेहल कुलकर्णी

100. 'फुले-आंबेडकरी संशोधनातील प्रदूषणे' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) चां. भ. खैरमोडे

(B) शंकरराव खरात

(C) राजा ढाले

(D) वसंत मून

www.prepp.in

Your Personal Exams Guide



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide